**SET-4**

**Series JMS/C**

**कोड नं.**
**Code No. 8**

रोल नं.
Roll No. | | | | | | | |

परीक्षार्थींनी उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर कोड नं. अवश्य लिहावा.
Candidates must write the Code on the title page of the answer-book.

- प्रश्न–पत्रिकेत **8** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्न–पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तर–पुस्तिकेच्या मुख–पृष्ठावर लिहा.
- प्रश्न–पत्रिकेत **10** प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक अवश्य लिहा.**
- प्रश्न–पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न–पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न–पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये.
- Please check that this question paper contains **8** printed pages.
- Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **10** questions.
- **Please write down the Serial Number of the question before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

# मराठी

# MARATHI

*वेळ : 3 तास* | *गुण : 80*

*निर्धारित समय : 3 घण्टे* | *अधिकतम अंक : 80*

*Time allowed : 3 hours* | *Maximum Marks : 80*

## SECTION A

**1.** खालील उतारा वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. *6*

शिक्षणाने माणूस सुसंस्कृत बनतो, तर अज्ञानाने माणूस अंधश्रद्धाळू बनतो. अज्ञान, अडाणीपणा आणि कष्टाशिवाय मोठे होण्याची हाव यामुळे समाजात अंधश्रद्धा फोफावत आहे. म्हणूनच म्हटले जाते माणसाने जरूर श्रद्धाळू असावे; पण अंधानुकरण करू नये. अंधश्रद्धा हे समाजाला शाप आहे. ते शाप कसे ठरते हे पाहण्यापूर्वी श्रद्धा म्हणजे काय ? अंधश्रद्धा म्हणजे काय ते पाहू.

श्रद्धा म्हणजे विश्वास. श्रद्धा जेव्हा वैज्ञानिक दृष्टिकोनातून खरी असते तेव्हा त्यावरचा विश्वास अधिक दृढ होतो; जेव्हा हीच श्रद्धा कार्यकारणभाव, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि शास्त्रीय संशोधनाच्या आधारे असेल तर तिचे विश्वासात रूपांतर होते. अन्यथा ती अंधश्रद्धा ठरू शकते. उदा. पोलिओच्या लसीकरणाने पोलिओ होत नाही. या घटनेवर श्रद्धा ठेवणे काहीच वावगे नाही; कारण त्याला शास्त्रीय आधार आहे; पण गुप्त धनासाठी किंवा पुत्र प्राप्तीसाठी नरबळी देणे, मरीआईचा कोप झाल्यावर तिचा गाडा ओढणे, ताप आल्यावर अंगारा लावणे, देवाला नवस बोलणे, देवाला देवदासी सोडणे इत्यादी बाबींवर विश्वास ठेवणे किंवा श्रद्धा ठेवणे म्हणजे अंधश्रद्धा होय. कारण अशा घटनांना शास्त्रीय आधार नाही. कार्यकारणभाव तपासता येत नाही. कार्यकारणभाव न तपासता ठेवलेला विश्वास म्हणजे अंधश्रद्धा होय.

आपण एकविसाव्या शतकात आणि विज्ञान युगात वावरत असलो तरी समाजातील अंधश्रद्धा अद्याप ही आहे तशाच आहे. काही नवीन निर्माण होत आहेत तर काही जुन्या नव्या रूपाने जन्माला येत आहेत. इतकेच ! समाजातील अज्ञानी, अडाणी व अंधश्रद्धाळू लोकांच्या कमकुवत मनाचा फायदा घेऊन अनेक भोंदूबाबा आपले कार्य साधत आहेत.

(i) माणूस या शब्दाचा समानार्थी शब्द खालीलपैकी कोणता ? *1*
(मानव, दानव, कणव)

(ii) श्रद्धा म्हणजे काय ? *1*

(iii) वरील उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. *1*

**किंवा**

शिक्षणाने माणूस <u>सुसंस्कृत</u> बनतो.
(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(iv) अंधश्रद्धेची कोण-कोणती उदाहरणे सांगितली आहेत ? *3*

**2.** खालील उतारा वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. *6*

किरण बेदींची कहाणी यशस्वी जरूर दिसते, पण ही वाट अजिबातच सरळसाधी नव्हती. एकतर हे क्षेत्र धकाधकीचं. इथे एकतर गुंडांशी गाठ असते किंवा बदल्यावर विश्वास न ठेवणाऱ्या व चांगल्या कामात अडथळा आणणाऱ्या व्यक्ती आड येतात. आपली वेगळी वाट निवडणाऱ्या आणि त्या वाटेवरून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना जेरीस आणेल अशी ही व्यवस्था आहे. याचा अनुभव किरण बेदींना सतत आला. पोलीस खात्यात बदल्या होतच असतात. पण किरण बेदींच्या बाबतीत बदलीचा अर्थ काही वेगळाच होता. एखादं चांगलं काम करून दाखवलं की त्याची प्रसिद्धी व्हायची, त्यांच्या कामाचं कौतुक व्हायचं, यामुळे आसपासची नाकर्ती माणसं दुखावली जायची आणि आहे त्या कामातून त्यांची बदली व्हायची. नव्या, अधिक अवघड अशा जागांवर त्यांची बदली व्हायची. पण त्याकडे किरण बेदींनी फारसं लक्ष दिलं नाही. त्या आपली वाट चालत राहिल्या. त्यामुळे त्यांच्या आदर्श व्यक्तिमत्वावर 'उडान' ही टीव्ही मालिका निघाली. जगप्रसिद्ध अशा 'लाईफ' मासिकाने त्यांच्या कामावर आधारित वृत्तांत छापला. रॅमन मॅगेसेसे हा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मिळाला, त्यांची पुस्तकं प्रसिद्ध झाली. ती अनेक भाषांमध्ये भाषांतरित झाली. अशा पद्धतीनी त्यांचा एक चाहता वर्ग तयार झाला. देशभर आणि जगभर त्यांच्या कामाची प्रशंसा झाली.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(i) (अ) पण किरण बेदींच्या बाबतीत बदलीचा अर्थ ________ वेगळाच होता. *2*
(सदैव, काही, नेहमी)

(ब) 'नाकर्ती' शब्दाचा अर्थ ______
(नावडती, काम न करणारी, दुसऱ्याचे काम न आवडणारी)

(ii) किरण बेदींना कोणता सर्वोच्च पुरस्कार मिळाला ? *1*

(iii) वरील उताऱ्यास योग्य शीर्षक द्या. *1*

**किंवा**

जगभर <u>त्यांच्या</u> कामाची प्रशंसा झाली.
(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(iv) किरण बेदींना कोणत्या गोष्टीचा सतत अनुभव येत असे ? *2*

## SECTION B

**3.** दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे निबंध लिहा. (कोणताही ***एक***) *7*

(i) वाचाल तर वाचाल !

मुद्दे — भारतीय संस्कृती — ग्रंथांचे महत्त्व — ज्ञान समृद्धी, सांस्कृतिक जडणघडण — प्रेरणादायी — न वाचनाचे तोटे —

(ii) देव बोलू लागला तर... !

मुद्दे — मंदिरात भक्तांची विविधता — मागण्या — प्रयत्न नको — गर्दी — ध्वनि प्रदुषण — अस्वच्छता — लोकांचा — स्वार्थ, लोभ, दांभिकपणा — बाजारीकरण

(iii) अंधश्रद्धा – एक शाप

मुद्दे — शिक्षणाचा अभाव — अंधश्रद्धेचा जन्म — श्रद्धा विज्ञानाधिष्ठित — अंधश्रद्धेची उदाहरणे — बुवाबाजी — अंधश्रद्धा-विरोधकांवर हल्ले — समाज जागृतीची आवश्यकता

**किंवा**

दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे गोष्ट लिहा. गोष्टीला शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.

मुद्दे —

आळशी ब्राह्मण — एक साधू घरी येतो — पती व पत्नी आदरातिथ्य करतात — साधू प्रसन्न — वरदान — सर्व कामे करण्यासाठी कोणीतरी हवे — राक्षसाची योजना — सर्व कामे एका क्षणांत — रिकामा राहिल्यास ब्राह्मणाला खाऊन टाकेल — ब्राह्मण घाबरतो — हुशार पत्नीची युक्ति — कुत्र्याचे वाकडे शेपूर सरळ करण्यास सांगते — राक्षसाला अशक्य — ब्राह्मणाला कपटाची सवय — तात्पर्य —

**4.** श्वेता नेवासकर, शिवनेरीनगर, कोंढवा, पुणे येथून व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ, पुणे यांना आपल्या भागातील पथदिवे बंद असल्याची तक्रार करणारे पत्र लिहिते. *5*
(पत्राखाली लिफाफा आवश्यक आहे)

**किंवा**

समर्थ पुणतांबेकर, बाजारपेठ, संगमनेर येथून आपल्या व्यायामशाळेसाठी, देव स्पोर्टस् टिळकरोड, पुणे या दुकानदारास योगामॅटस् (आसने) मागविणारे पत्र लिहितो.
(पत्राखाली लिफाफा आवश्यक आहे)

## SECTION C

**5.** (अ) सुचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही ***चार***) *4*

(i) मोर हा राष्ट्रीय पक्षी आहे. (विशेषण ओळखा)

(ii) उमेशचा चेहरा <u>आनंदाने</u> खुलला होता. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(iii) त्याने नवीन पुस्तके आणली. (सर्वनाम ओळखा)

(iv) विनयने काम पूर्ण केले <u>आणि</u> तो घरी गेला. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(v) शुभांगी छान चित्र काढते. (क्रियापद ओळखा)

(vi) वा वा ! फारच छान कल्पना आहे ही ! (केवलप्रयोगी अव्यय ओळखा)

(आ) पुढील वाक्ये कंसातील सुचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) प्रत्येकाने नियम पाळावेत. (प्रयोग ओळखा)

(ii) ही कविता सोपी आहे. (नकारार्थी वाक्य करा)

(iii) पंकज आईला घरकामात मदत करतो. (कर्मणी प्रयोग करा)

(iv) हा अजगर खूपच मोठा आहे. (उद्‌गारार्थी वाक्य करा)

(इ) सुचनेनुसार बदल करा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) तुला पाहून मीराला खूप आनंद झाला होता. (भविष्यकाळ करा)

(ii) शेजारी आपल्याला खूप मदत करतात. (काळ ओळखा)

(iii) सुनंदा बाळाला घेऊन जाईल. (भूतकाळ करा)

(iv) सचिन तुला पुस्तक देईल. (वर्तमानकाळ करा)

(ई) लिंग बदला. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) जनक

(ii) नात

(iii) दीर

(iv) लांडोर

(उ) वचन बदला. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) पुस्तक

(ii) गाय

(iii) वात

(iv) नदी

(ऊ) समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही ***दोन***) *2*

(i) फूल

(ii) मंदिर

(iii) पान

(iv) पर्वत

(ए) विरुद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही ***दोन*** ) 2

(i) सजीव

(ii) मित्र

(iii) वाकडे

(iv) जवळ

## SECTION D

**6.** (अ) योग्य पर्याय शोधून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही ***चार*** ) 4

(i) मी परवा एक __________ तुरुंग पाहिला.
(खूप, मोठा, मुक्त, छान)

(ii) पन्हाळयाच्या उरूसातील संदलचा दिवस म्हणजे स्त्रियांच्या __________ दिवस.
(कामाचा, आनंदाचा, मानाचा)

(iii) तिला भीतीच वाटली, ही पोरं ________ वळणावर जातात की काय ?
(मुंग्यांच्या, माणसाच्या, वाईट)

(iv) स्वामीजी, माझ्या सुदैवाने आपला लाभ या ________ झालेला आहे.
(घराला, रंगशाळेला, गावाला)

(v) असे जीवन जगत असताना __________ शाळेतच अधिक शिकलो.
(इंग्रजी, बिनभिंतीच्या, वर्ध्याच्या)

(vi) माझं मन या ऋतूमधल्या नव्या वळणाबरोबर धुमावल्यासारखे ________ झाले आहे.
(उत्साहीत, चैतन्यमय, आनंदी)

(आ) खालील प्रश्नांची उत्तरे पूर्ण वाक्यात लिहा. (कोणतेही ***सहा*** ) 6

(i) जन्माला आल्या दिवसापासून माणसाला कशाची चिंता असते ?

(ii) ‘संदल पिसणे’ म्हणजे काय ?

(iii) पुस्तकराव कोणाचा मित्र बनतो ?

(iv) ‘बाबजी’ या अक्षराकडे पाहून लेखकाला कोणता भास झाला ?

(v) आनंदवनाच्या निर्मिती आधी बाबांनी कोणता प्रयोग केला होता ?

(vi) बी.जी. वाघ यांनी कर्मद्ररिद्री देश कोणास म्हटले आहे ?

(vii) शांता शेळके यांच्यामते भारतीय आणि अमेरिकन आईमध्ये कोणते साम्य आहे ?

(viii) चेतूने विवेकानंदाकडे कोणता आग्रह धरला होता ?

**7.** (अ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही ***तीन***) *6*

| (i) ऋषींचे आणि नदीचे काय शोधू नये ? | |
|---|---|
| ↓ | ↓ |
| 1 | 2 |

| (ii) नवभारत विद्यालयात कोणते दोन साहित्यिक शिक्षक होते ? | |
|---|---|
| ↓ | ↓ |
| 1 | 2 |

| (iii) हिमालयाच्या चित्रामध्ये लेखकाला आणखी कोणती चित्रे हवी ? | |
|---|---|
| ↓ | ↓ |
| 1 | 2 |

| (iv) नारायण सुर्वेना रशियातर्फे कोणता पुरस्कार मिळाला व कधी ? | |
|---|---|
| ↓ | ↓ |
| 1 | 2 |

| (v) विवेकानंदांना रविवर्म्याच्या कोणती दोन गोष्टी पहावयाच्या होत्या ? | |
|---|---|
| ↓ | ↓ |
| 1 | 2 |

(आ) 30 ते 40 शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही ***दोन***) *6*

(i) मित्रमंडळींशी गप्पा मारताना आपण खूप मुक्त, मोकळे नसतो, असे शांता शेळके यांना का वाटते ?

(ii) आनंदवनाच्या निर्मितीआधी बाबा आमटे यांनी वरोऱ्याला केलेल्या प्रयोगाचे थोडक्यात वर्णन करा.

(iii) निसर्गाची माणसांकडून कोणती अपेक्षा असते ?

(iv) नारायण सुर्वेना सोव्हिएट रशियातर्फे पुरस्कार मिळाल्याचे कृष्णाबाईंना विशेष महत्त्वाचे का वाटले होते ?

**8.** (अ) योग्य पर्याय निवडून वाक्ये परत लिहा. (कोणतेही ***चार***) *4*

(i) गर्द सावली ________ वारा गातो अंगाई.
(पडलेली, पसरलेली, पहुडलेली)

(ii) चंद्र, सूर्य अन् इथली माती यांना ________ लाख प्रणाम ।
(माझे, अमुचे, करते)

(iii) गाऊ ________ गाणी गं.
(जीवन, उजेड, सुंदर)

(iv) मातीलाही सुगंध यावा ________ भाकरीचा.
(श्रमाच्या, कष्टाच्या, प्रेमाच्या)

(v) दयासागरा अनंता । ________ पंढरीनाथा ।
(दया करी, क्षमा करी, कृपा करी)

(vi) जिथे ________ तेथे उभा श्याम आहे.
(नाम, काम, राम)

(आ) पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ***तीन***) *3*

(i) प्रलयकारी घरे आणि शहरांमध्ये कोणते बदल व्हावेत ?

(ii) आपल्या भावी कवीचे मन कोठे रेंगाळते ?

(iii) संत सोयराबाईने संसाराची तुलना कोणकोणत्या गोष्टींशी केली आहे ?

(iv) 'माझ्या घरट्यात' या कवितेत घरट्यात नसलेल्या कोणत्याही तीन गोष्टी लिहा.

(v) 'आपण धरणी गं' कवितेतील स्त्री कोणती ललकारी देऊ इच्छिते ?

**9.** (अ) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा तुम्हां समजलेला अर्थ लिहा. *3*

(i) यसे नो सदा स्वेदगंगेकिनारी

(ii) आणि माणसंच वागावीत माणसासारखी माणूस म्हणून

(iii) गावापासून केले दूर वीतभरच्या पोटाने

(आ) आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही ***दोन***) *4*

(i) आपण यशोधरेच्या आणि जिजाऊच्या कोण आहेत ?

↓ ↓

| | |
|---|---|
| 1 | 2 |

(ii) माझ्या घरट्यात कोणत्या दोन गोष्टींची रास नाही ?

↓ ↓

| | |
|---|---|
| 1 | 2 |

(iii) हरी कोठे नाही ?

↓ ↓

| | |
|---|---|
| 1 | 2 |

**10.** खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे 30 ते 40 शब्दांत लिहा. (कोणतेही ***दोन***) *4*

(i) आजीने पुस्तकांचे महत्त्व कोणत्या शब्दांत वर्णन केले आहे ?

(ii) जुईला कोणाकोणाला व कधी मदत करण्याची इच्छा आहे ?

(iii) लेखकाने सांगितलेली कोल्हापूरच्या गुळाची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.